# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 18 June 2024

Time: 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १८ जून २०२४ सकाळी ७.१० मि.**

********

***ठळक बातम्या***

- **पंतप्रधान नरेंद्र मोदी आज शेतकरी सन्मान निधीचा १७ वा हप्ता जारी करणार ;देशभरात निवडक ५० कृषी विकास केंद्रांवर विशेष कार्यक्रम–हिंगोलीत राज्यमंत्री रक्षा खडसे यांची उपस्थिती**
- **ओबीसी आरक्षण आंदोलकांच्या शिष्टमंडळाची आज राज्य मंत्रिमंडळासोबत बैठक**
- **नागपुरात मद्यधुंद कारचालकाने रस्त्यालगत झोपलेल्या नऊ जणांना चिरडले–दोघांचा मृत्यू**
- **बकरी ईदचा सण सर्वत्र भक्तिभावानं साजरा**

**आणि**

- **राज्यात विविध जिल्ह्यांत पोलिस विभागातल्या रिक्त पदांसाठी उद्यापासून भरती प्रक्रिया**

***सविस्तर बातम्या***

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज शेतकरी सन्मान निधीअंतर्गत २० हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा १७ वा हप्ता जारी करणार आहेत. नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम थेट जमा होईल. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ११ कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना, तीन लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा लाभ झाला आहे. उत्तर प्रदेशातल्या वाराणसी इथं होणाऱ्या याच

कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते, स्वयं सहाय्यता गटातल्या ३० हजारांहून अधिक महिलांना कृषी सखी प्रमाणपत्राचं वाटप करण्यात येणार आहे.

देशभरात निवडक ५० कृषी विकास केंद्रांवरही विशेष कार्यक्रमांचं आयोजन यावेळी केलं जाणार आहे. हिंगोली जिल्ह्यात तोंडापूर इथल्या कृषी विज्ञान केंद्रात, केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष शिवाजीराव माने, डॉ. पी.पी.शेळके यांनी या कार्यक्रमासाठी पूर्ण नियोजन केलं आहे. यावेळी हिंगोली जिल्ह्यातल्या काही शेतकऱ्यांशी पंतप्रधान थेट संवाद साधणार असल्याची माहिती शेळके यांनी दिली.

येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भद्रासनाची माहिती देणारी एक चित्रफित काल सामाजिक माध्यमांवर सामायिक केली.

दरम्यान, पंतप्रधान मोदी आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमाच्या १११व्या भागात या महिन्याच्या अखेरच्या रविवारी, ३० जूनला देशवासियांशी संवाद साधणार आहेत.

****

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी केरळमधल्या वायनाड मतदार संघातून खासदारकीचा राजीनामा देणार असून, त्यांचा जागी पक्षाच्या महासचिव प्रियंका गांधी वाड्रा या वायनाडची पोटनिवडणूक लढवणार आहेत. काल पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या उपस्थितीत गांधी यांनी ही घोषणा केली. राहुल गांधी यांनी यंदा वायनाड आणि रायबरेली या दोन मतदार संघातून लोकसभेची निवडणूक लढवली होती, दोन्ही मतदार संघातून ते निवडून आले आहेत.

****

ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नये या मागणीसाठी, जालना जिल्ह्यात वडीगोद्री इथं उपोषणकर्त्या आंदोलकांच्या पाच सदस्यीय शिष्टमंडळ आज राज्य मंत्रिमंडळासोबत बैठक होणार आहे. सरकार या शिष्टमंडळाशी त्यांच्या मागण्यांबाबत चर्चा करणार आहे.

दरम्यान, राज्य सरकारच्या शिष्टमंडळानं काल सकाळी या आंदोलकांची भेट घेत उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती. ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, असं लेखी आश्वासन सरकानं द्यावं, अशी मागणी उपोषणकर्ते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी केली आहे.

राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे आणि भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी काल उपोषणकर्त्यांची भेट घेतली. वंचिताच्या मागण्यांसाठी आम्ही उपोषणकर्त्यांसोबत असल्याचं पंकजा मुंडे यांनी सांगितलं.

****

नागपूर शहरात मद्यधुंद अवस्थेत असलेल्या कारचालक युवकाने पदपथावर झोपलेल्या नऊ जणांना चिरडले असून, यात दोन महिलांचा मृत्यू झाला तर इतर ७ जण जखमी झाल्याचं वृत्त आहे. रविवारी मध्यरात्रीनंतर हा अपघात झाला. या प्रकरणी पोलीसांनी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या सहा युवकांना ताब्यात घेतलं, त्यावेळी हे सर्व जण मद्याच्या अंमलाखाली असल्याची माहिती पोलीसांनी दिली आहे.

****

पश्चिम बंगालमध्ये दार्जिलिंग जिल्ह्यात झालेल्या रेल्वे अपघाताची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल सायंकाळी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली, तसंच रुग्णालयात जाऊन जखमींची चौकशी केली. मृतांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपये तर गंभीर जखमींना अडीच लाख रुपये रेल्वेमंत्र्यांनी मदत जाहीर केली. या अपघाताच्या पार्श्वभूमीवर ईशान्येकडे जाणाऱ्या मार्गावरच्या अनेक रेल्वेगाड्या सध्या रद्द करण्यात आल्या आहेत. काल सकाळी झालेल्या या अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला असून, ५० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. पंतप्रधान मोदी यांनी मृतांच्या वारसांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून दोन लाख, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

****

१८ व्या 'मिफ' अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात काल तिसऱ्या दिवशी बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी गेल्या काही वर्षांत निवडल्या गेलेल्या निवडक चित्रपटांसह, भारतीय लघुपट, माहितीपट आणि ॲनिमेशन पट दाखवण्यात आले. 'गुमनाम दिन' या माहितीपटाच्या दिग्दर्शक एकता मित्तल यांनी काल वार्ताहरांशी संवाद साधला. रोजगाराच्या शोधात बंगळुरूमध्ये आलेल्या स्थलांतरित मजुरांची कहाणी या माहितीपटात मांडली आहे. या माहितीपटाची प्रक्रिया, भावनिक गुंतवणूक आणि या प्रक्रियेने दिलेले धडे एकता मित्तल यांनी उलगडून सांगितले.

****

बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांच्या सहकार्यातून जिल्हा नियोजन समितीच्या निधी खर्चाचं सुयोग्य नियोजन केलं जाईल, असं पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे. बीड इथं काल जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत २०२३-२४ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात आलेल्या निधीच्या अहवालास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

दरम्यान, २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी सुमारे ५४५ कोटी ४९ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

****

बकरी ईदचा सण काल सर्वत्र भक्तिभावानं साजरा झाला. पारंपरिक पद्धतीनं नमाज पठणासह इतर कुर्बानी आणि इतर धार्मिक विधी पार पडले. छत्रपती संभाजीनगर इथं महापालिकेनं तीन ठिकाणी केलेल्या तात्पुरत्या कत्तलखान्यात काल म्हैस तसंच बकरीवर्गीय सुमारे शंभर जनावरांची कुर्बानी देण्यात आल्याचं, महापालिकेकडून जारी पत्रकात म्हटलं आहे.

****

लातूर शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी बकरी ईद पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली. लातूर शहरातल्या ईदगाह मैदानावर सामुहिक नमाज पठण करण्यात आलं. त्यानंतर जगभरात शांततेसाठी सामुहिक प्रार्थना करण्यात आली.

****

जालना शहरासह जिल्ह्यात बकरी ईद पारंपरिक पद्धतीनं उत्साहात साजरी करण्यात आली. जालना शहरातल्या कदीम ईदगाह मैदानावर मुस्लीम समाज बांधवांनी सामुहिक नमाज अदा करून विशेष प्रार्थना केल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

ज्ञानराधा मल्टिस्टेट कोऑपरेटिव्ह बँकेचे संचालक संजय कुटे आणि इतर पाच जणांविरुद्ध जालना जिल्ह्यातल्या अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अंबड शहर आणि तालुक्यातल्या १२५ ठेवीदारांची सुमारे ७० ते ८० कोटी रुपये मुदतठेव ज्ञानराधा मल्टिस्टेट बँकनं परत न देता फसवणूक केल्याची तक्रार व्यावसायिक लक्ष्मण सावंत यांनी केली, त्यानुसार ही कारवाई करण्यात आली. या बँकेतल्या संबंधित ठेवीदारांनी आपल्या कागदपत्रांसह जिल्हा आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क करण्याचं आवाहन पोलीस प्रशासनानं केलं आहे.

****

परभणी जिल्ह्यात रविवारी मध्यरात्री तीन मंडळात अतिवृष्टी झाली. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातल्या पिंपलगड नाल्यावरील पूल पाण्याच्या प्रवाहामुळे वाहून गेला. सोनपेठ तालुक्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली.
नांदेड जिल्ह्यातही अनेक ठिकाणी जोरदार पाऊस जाला. बिलोली तालुक्यातल्या हिंगणी इथं आनंदा रहाटे या शेतकर्याचा अंगावर वीज कोसळून मृत्यू झाला.

****

राज्यात विविध जिल्ह्यांत पोलिस विभागात रिक्त पदांसाठीची भरती प्रक्रिया उद्यापासून सुरू होत आहे. छत्रपती संभाजीनगर इथं सुमारे साडे सातशे, परभणीत १४१ तर जालना पोलीस दलात पोलीस शिपाई पदाच्या १०२ आणि चालक पदाच्या २३ जागांसाठी ही भरती प्रक्रिया होईल. या प्रक्रियेदरम्यान उमेदवारांनी कुठल्याही अमिषाला बळी पडू नये, असं आवाहन जालन्याचं पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी केलं आहे.

****

लातूर पोलिसांनी अवैध पिस्तुल बाळगल्या प्रकरणी एका तरुणाला अटक केली. त्याच्याकडून पिस्तुलासह दोन जिवंत काडतुसं आणि मॅगझीन जप्त करण्यात आलं. महेश कुलकर्णी या तरुणाचं नाव आहे. याप्रकरणी औसा तालुक्यात भादा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीला एका प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा झाली असून, सध्या तो जामिनावर त्याच्या मूळ गावी आला असता, त्याच्याकडे पिस्तुल आढळल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर इथं चरस विक्री करणाऱ्या दोन जणांना शहर पोलिसांनी ताब्यात घेतलं असून, त्यांच्याकडून चार लाख रुपयांच्या २७१ ग्रॅम चरससह गावठी पिस्तुल, कोयता आणि चाकू आदी साहित्य जप्त केलं. आदिल हामद बिन चाऊस आणि शब्बीर अली अजगर अली अशी या आरोपींची नावं असून, त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

****

धाराशिव इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उप परिसरात चौथ्या धाराशिव नाट्यमहोत्सवाचं उद्घाटन विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अंकुश कदम यांच्या हस्ते काल झालं. यावेळी मान्यवरांनी नाट्यशास्त्र आणि लोककला विभागातल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

****

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाचे रेल्वे विभागीय व्यवस्थापक नीरज कुमार दोहारे यांनी कुर्डुवाडी आणि लातूर सेक्शनची पाहणी केली. लातूर रेल्वे स्थानकावर 'अमृत स्टेशन योजना' अंतर्गत कामाची पाहणी करुन त्यांनी नवीन पीट लाइनचं भूमिपूजन केलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शुलीभंजन इथं काल चारचाकी दरीत कोसळून एका युवतीचा मृत्यू झाला. सामाजिक माध्यमांवर टाकण्यासाठी चित्रफीत करत असतांना, हा अपघात झाल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****